निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २३० वा.
गुरुवार :२३ ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247




## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पोलीस हुतात्म्यांना अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षभरात संपूर्ण देशात शहीद झालेल्या पोलीस हुतात्म्यांना नायगाव पोलीस मुख्यालय येथील पोलीस स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी मुंबई उपनगर–चे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पो–लीस आयुक्त देवेन भारती, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत व प्रतिनिधी, वरिष्ठ पोलीस अधिकारी व निमंत्रित यांनी देखील पोलीस स्मृतिस्तंभाजवळ जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या संदेश वाचनातून गेल्या वर्षभरात देशात हौतात्म्य प्राप्त झालेल्या ३४ पोलीस अधिकारी व १५७ पोलीस अंमलदार अशा एकूण १९१ वीर शहीदांना त्यांच्या अतुलनीय बलिदानाबद्दल श्रद्धांजली वाहिली.












# भाऊबीजच्या निमित्ताने पौर्णिमेपर्यंत व्हावे वृक्षारोपण;बहीण-भावाप्रमाणेच पृथ्वीला गरज वृक्षांची.

ज्याप्रमाणे बहीणीला भावाची गरज आहे. त्याचप्रमाणे आज पृथ्वीमातेला आपल्या सर्वांची गरज आहे. त्यामुळे भाऊबीजच्या निमित्ताने पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रत्येकांनी वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.बंधुत्व टिकून राहण्यासाठी भाऊबीज ओवाळणीचा कार्यक्रम कार्तिक पौर्णिमेपर्यंत चालतो. भारतीय संस्कृतीत संपूर्ण सणांना आगळे-वेगळे महत्व आहे.आठवीच्या सनापासुन दिवाळीची चाहूल सर्वत्र लागते आणि आठवड्याभरातच दिवाळीला प्रारंभ होतो व लक्ष्मीपूजन येते व संपूर्ण भारतात दिवाळीचा आनंद मोठ्या प्रमाणात दिव्याप्रमाणे प्रज्वलित होतो.लक्ष्मी पुजनानंतर कार्तिकला सुरूवात होते.कार्तिकच्या प्रथमेला बलिप्रतिपदा येते. आपण त्याला दिवाळीचा पाडवा म्हणतो, गाईगोधन,गोवर्धन पुजा अश्या अनेक नावांनी या सणाला महत्त्व देवुन पुजाअर्चना करतो.या दिवशी शेतकरी बांधव गाई-मशीची आंघोळ करून पुजाअर्चना करतात.कारण यामुळे मुक्या जनावरांमध्ये सुध्दा उत्साहाचे वातावरण निर्माण व्हावे हा सर्वांचा उद्देश असतो.कारण मानव कीतीही हुशार आणि बुद्धीजीवी प्राणी असला तरीही त्याला अनेक कठीण प्रसंगी मुक्या प्राण्याचा सहारा घ्यावाच लागतो.त्यांना मानव परिवारापासुन कदापी वेगळे करता येत नाही. कारण मानवांच्या आहारामध्ये सर्वात मोठा वाटा गाय,म्हैस इत्यादी सह अनेक प्राण्यांचा आहे. दही,दुध,तुप,लोनी आणि यापासून अनेक व्यंजन युक्त पदार्थ ही गाई-मशींच्याच दुधापासून बनत असतात.त्याचप्रमाणे गाई-मशीच्या शेणापासून खत तयार होते व यांचा फायदा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होतो. म्हणजेच गाय,म्हैस किंवा अन्य पाळीव प्राणी हे आपल्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून व सुरक्षिततेच्या दृष्टीने ढालच आहे.मुक्या प्राण्यांमुळेच शेतीची मशागत होते व यातुनच अन्नधान्य निर्माण होते आणि आपल्या पोटाची खळगी भरते.कार्तिक व्दितीया म्हणजे भाऊबीज या सणाला भारतात आगळ-वेगळे महत्व आहे.कारण भाऊ बहिणीपासुन कितीही दुर असला तरी या सणाचा कधीच विसर पडत नाही. भाऊबीजेला सर्वत्र अक्षवणाचा कार्यक्रम होतो.परंतु भाऊ-बहिण जर काही कारणास्तव भाऊबीज या दिवशी जरी अक्षीद लावु शकली नाही तरी यांचे मीलन हे कार्तिक पौर्णिमेपर्यंत किंवा नागदिवाळीपर्यंत अक्षीद लावता येते.कारण बहिण-भाऊ यांचं नाते अतुट रहावे हाच यामागचा मुख्य उद्देश आहे व देवाने ओवाळणीचा कालावधी वाढविला असावा असे मला वाटते. म्हणजेच भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणाला आगळी-वेगळे महत्व अवश्य दिसून येते.कारण या संपूर्ण सणांवरून लक्षात येते की भारतीय संस्कृतीची एकच परीभाषा आणि उद्देश आहे तो म्हणजे बंधुत्व टिकून ठेवने.दिवाळी हा सण आला म्हणजे आपल्या बहिणीला किंवा सासरी गेलेल्या मुलीला आपल्या घरी दिवाळीला आणण्याची प्रथा असते. म्हणून बहीण भाऊ यांचा सण म्हणजेच भाऊबीज असेही माणल्या जाते. आपण भाऊबीज हा सण मोठ्या प्रेमाने आणि उत्साहाने साजरा करतो यात दुमत नाही. परंतु बदलते हवामान व ग्लोबल वॉर्मिंगमुळे वाढते प्रदुषण पहाता भाऊबीज या सणाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होने गरजेचे आहे. त्याचप्रमाणे भारतासह संपूर्ण जगात प्रदूषणाचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे व प्रदुषणाच्या बाबतीत भारत सध्या रेडझोनमध्ये आहे. परंतु मानव बुद्धीजीवी प्राणी आहे त्यामुळे यावर आपणच आवर घालू शकतो.याकरीता भाऊबीज या सणाचे औचित्य साधून बहीणीने भावाला व भावाने बहिणीला एकतरी झाड भेट दिले पाहिजे.यामुळे भाऊबीज हा सण साजरा होईलच परंतु बहीण-भावाच्या आगळ्यावेगळ्या नात्यांमध्ये झाडांसोबत सुध्दा प्रेम वाढेल आणि ही आठवण अनंत काळपर्यंत अबाध्य राहिल व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड झाल्याचे आपल्याला दिसुन येईल.यामुळे आपण अनेक जीव जंतू,पशु-पक्षी व मानव यांचे प्राण वाचवीसाठी मोठी मदत मिळेल.त्याचप्रमाणे पृथ्वीचे संतुलन टिकवण्यासाठी बहीण-भावाचा मोठा वाटा आपल्याला दिसुन येईल.भाऊ बहिणीचे पवित्र नातेसंबंध अतुट रहावे आणि रहाले पाहिजे. कारण बहिण भावाला जेव्हा ओवाळते तेव्हा ईश्वराजवळ त्यांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते व बीजेच्या कोरीप्रमाणे बंधुत्व टीकावे अशी अपेक्षा करते.भाऊबीजेच्या निमित्ताने बहिण भावाला व भाऊ बहिणीला वस्तूंच्या रूपात काहीतरी भेटवस्तू देत असते ती दिलीच पाहिजे सोबतच एक वृक्ष सुध्दा दिले पाहिजेत.कारण बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा हा सण आहे. त्यामुळे सर्वांनीच वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष द्यायला हवे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण प्राणीमात्रांना शुद्ध हवा,ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.निसर्ग सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित, पृथ्वी सुरक्षित तर संपूर्ण जीवजंतू-पशु-पक्षी व आपण सुरक्षित हा मुलमंत्र भाऊबीज या निमित्ताने सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.या निमित्ताने निसर्गाचे संगोपन होईल हीच भाऊबीजेच्या निमित्ताने आग्रहाची विनंती. भाऊबीज निमित्त हार्दिक शुभेच्छा! जय हिंद.


## कृषि उत्पन्न बाजार समिती धर्माबाद तर्फे सर्व

शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, गुमास्ता व हमाल बांधवांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

**शुभ दीपावली**

**शेतकरी बांधवांना आवाहन**

**याद्वारे शेतकरी बांधवांना विनंती पुर्वक कळविण्यात येते की,**

१) शेतकऱ्यांनी आपला शेतमाल विक्री करण्यापूर्वी शेतमाल वाळवून, सुकवून, स्वच्छ करून आणावा.तसेच खरेदीदार हा धर्माबाद बाजार समितीचा लायसन्सधारक व्यापारी आहे काय याची खात्री करून घ्यावी.

२) शक्यतोवर आपला शेतमाल मार्केट यार्डातच विक्रीस आणावा. आपला माल विकल्यावर खरेदीदाराकडून न चुकता बाजार समितीची हिशेब पट्टी(पिवळी पावती) घ्यावी.

३) कोऱ्या कागदावर, चिठ्ठी वर व्यवहार अजिबात करु नका.

४) कृपया अनामत व्यवहार, कंडिशनल व्यवहार करु नका. थोडक्या पैश्याच्या अमिषाला बळी पडून स्वतःची फसवणूक करून घेऊ नका.

५) कृपया बाजार भावाकडे लक्ष ठेवत जा. शेतीमालामध्ये मोठ्या प्रमाणात तेजी मंदी होत असल्यामुळे अनामत व्यवहारातून आर्थिक धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ६) गेल्यावर्षी अनामत व्यवहार कंडिशनल व्यवहार तसेच कोऱ्या कागदावरील व्यवहार केलेल्या बऱ्याच शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसलेला आहे.

७) जर कोणताही व्यापारी बटाव,कट्टी आडत किंवा इतर कोणताही छुपा खर्च आकारुन शतकऱ्यांची आर्थिक लुट करीत असल्यास तसेच पिवळी पट्टी देण्यास नाकारत असल्यास बाजार समितीला कळवावे. अशी माहिती देणाऱ्या शेतकऱ्याचे नाव उघड करण्यात येणार नाही गुप्त ठेवण्यात येईल याची नोंद घ्यावी व संबंधित व्यापाऱ्याविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.

८) कापूस उत्पादक शेतक-यांनी किमान आधारभुत किंमतीने सी.सी.आय ला कापूस विक्री करण्यासाठी कपास किसान या मोबाईल ॲपव्दारे स्वतःची नोंदणी करावी. अधिक माहिती साठी बाजार समिती कार्यालयाशी संपर्क साधावे.

करीता आपण रात्रंदिवस काबाडकष्ट करून पिकविलेल्या मालाला योग्य दाम मिळण्यासाठी आणि अचुक व्यवहार होण्यासाठी कृपया आपण आपला शेतमाल धर्माबादच्या मार्केट यार्डातच विक्रीस आणावा असे आवाहन करण्यात येते.

**सि.डी.पाटील**
**सचिव**

**स्वाक्षरीत/-**
**एस.एस. गायकवाड**
**प्रशासक तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जि.नांदेड**
**कृषि उत्पन्न बाजार समिती धर्माबाद**


## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात बी. ए. एम.एस. डॉक्टर झाल्याबद्दल मल्हारी लवटेंचा सत्कार सोहळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे गांवातील संभाजी भानुदास लवटे यांचा मुलगा मल्हारी संभाजी लवटे हा बी. ए. एम.एस. डॉक्टर झाल्याबद्दल त्याचा स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव ता. केज जि. बीड च्या वतीने दिनांक १९ - १० -२०२ ५ रोजी भव्य सत्कार सोहळा घेवून मल्हारी संभाजी लवटे याचा शाल, श्रीफळ, पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.मल्हारी संभाजी लवटे याचा डॉक्टर झाल्याबद्दल ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, प्राचार्य, डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तसेच मल्हारीचे वडिल त्यांची हलाखीची परिस्थिती असतानाही मुलाच्या शिक्षणासाठी अहोरात्र कष्ट उपसले म्हणून संभाजी भानुदास लवटे यांचाही ग्रंथालयाच्या वतीने रविंद्र गायकवाड ( पेंटर) यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.यावेळी सत्काराला उत्तर देताना संभाजी लवटे म्हणाले की मी २९ वर्षापासून या स्वानंद सार्वजनिक वाचनालयाचा वाचक सभासद आहे. त्यामुळे मलाही वाचनाची आवड लागली व मुलालाही वाचनाची सवय लागली, त्याचा परिणाम आज माझा मुलगा आज डॉक्टर झाला याचा मला मनस्वी आनंद आहे.माझ्या व मुलाच्याही जडणघडणीत स्वानंद सार्वजनिक वाचनालयाचा व ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे मी कायम ग्रंथालयाचा ऋणी आहे.सत्काराला उत्तर देताना डॉ. मल्हारी संभाजी लवटे यांनी स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव ता. केज जि. बीड या ग्रंथालयाचे कार्य व प्रेरणादायी उपक्रम व नियमीत वाचन यामुळे मला दिशा मिळाली. या ग्रंथालयामुळे माझ्या सारख्या शेकडो विद्यार्थांना दिशा मिळाली असे सांगी १० जन आज शासकीय, अशासकीय नोकरीत आहेत. तसेच नवोदय साठीही बरेच विद्यार्थी लागले आहेत.

## आ. प्रकाश दादा सोळंके यांनी धारूरच्या प्रभाग चार मधून उमेदवारी दिल्यास संधीच सोनं करणार -- रोहित फावडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**किल्ले धारूर/ प्रतिनिधी/** निवडणूकीच्या रणधुमाळी सुरू होताच शहरातील सर्व वार्डात राजकीय हालचालींना वेग आला आहे. याच आगामी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ मध्ये सामाजिक कार्यकर्ते रोहित फावडे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असून. रोहित फावडे यांनी आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या कडे उमेदवारी मागितल्याने प्रभागातील मतदारांचा अधिकचा पाठिंबा विशेष तरुण उमेदवार असल्याने त्यांना मिळत असून युवक यांच्यासह ज्येष्ठांचा उत्साह वाढला आहे.




शहरात राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला असून दी.१७ ऑक्टोबर रोजी माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके व मतदार संघाचे नेते रमेशरावजी आडसकर साहेब, वडवणीचे ज्येष्ठ नेते राजाभाऊ आण्णा मुंडे या मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली धारूर शहरातील नगराध्यक्ष, नगरसेवक या पदाच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाकती चे आयोजन कृषी उत्पन्न बाजार समिती येथे करण्यात आले होते.

रोहित फावडे यांचा नागरिक, युवक आणि महिला वर्गामध्ये त्यांच्या कार्याचा चांगला प्रभाव असून, विकासाभिमुख आणि प्रामाणिक नेतृत्व म्हणून त्यांची ओळख झाली आहे. या प्रभाग चार मधून ओपन पुरुष साठी जागा असल्याने सामाजिक कार्यकर्ते रोहित फावडे यांनी आमदार प्रकाश दादांकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षा मधून उमेदवारीची मागणी केली असल्याने सर्वसामान्य जनतेला आपेक्षा आहे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष प्रभाग चार मध्ये रोहित फावडे यांना उमेदवारी देतील.रोहित फावडे हे एक सामाजिक भान असलेले सर्वसामान्यांच्या अडचणी समजून घेणारे आणि त्या सोडवण्यासाठी कायम तत्पर असलेले कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात . वॉर्डातील युवक,ज्येष्ठ, नागरिक आणि महिला वर्गाचा त्यांना विशेष पाठिंबा लाभत आहे.

आ. दादांनी माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी दिली तर प्रत्येक कुटुंबाचा प्रश्न माझा स्वतःचा समजून मी काम करीन नागरिकांचा विश्वास हीच माझी ताकद असल्याने आमदार प्रकाश दादा यांनी उमेदवारी दिली तर नक्कीच प्रभाग चार मध्ये संधीच सोनं करून दाखवेल असे रोहित फावडे यांनी सांगितले आहे.रोहित फावडे हे मागच्या अनेक वर्षापासून जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करत असल्याने रोहित फावडे या सर्वसामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देतील असा विश्वास मतदारांनी व्यक्त केला आहे.प्रभागातील जनतेची प्रामाणिकपणे सेवा करून दादांनी संधी दिली तर नक्कीच संधीच सोन करू असे प्रसिद्ध पत्रामध्ये बोलताना फावडे यांनी सांगितले.

## सण दिवाळी सुखाचा....

दिवा पणतीची ज्योत
लख्ख पेटली अंगणी
नष्ट अज्ञान, अंधार
तेजाळली अंतर्मनी....

उंच आकाश कंदील
रुबाबाने झळकतो
यश, कीर्ती समाधान
सारे घरास मागतो....

सुगंधित उटण्याने
जसा देह गंधाळतो
मानवता दातृत्वाने
गंध कार्याला लाभतो....

चवदार फराळाची
गोडी शब्दांना लागू दे
दुरावल्या माणसांना
पुन्हा प्रेमाने भेटू दे....

उजळले आसमंत
दीपोत्सव प्रकाशाचा
घरा-घरात होऊ दे
सण दिवाळी सुखाचा....

दिवाळी प्रकाशोत्सवाच्या
आपणास मन:पुर्वक शुभेच्छा...!

**-मयूर मधुकरराव जोशी**
लेखक, कवी, कथाकार, गझलकार, समीक्षक, सुत्रसंचालक, व्याख्याता, समुपदेशक विठ्ठल-रुक्मिणी नगर , जिंतूर. जि. परभणी.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बोनस : सामाजिक न्यायाचा आर्थिक पाया

भारतीय समाजामध्ये सामाजिक न्याय हा केवळ राजकीय किंवा कायदेशीर अधिकारांचा प्रश्न नसून त्याच्या पाठीशी आर्थिक समता आणि कामगारांच्या श्रममानाचा अंक आहे. या अर्थाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतिशय निर्णायक ठरते. त्यांनी सामाजिक अन्याय, जातीवाद व आर्थिक शोषण या त्रिसंयोजनाचा अभ्यास करून कामगार वर्गाचे हक्क आर्थिक व सामाजिक समतोलाने जाहीर करण्याचा प्रयत्न केला.

त्यांचे श्रमहितधर्माचे तत्त्व, कामगार कल्याणाचे धोरण व 'बोनस' या संकल्पनेचा समाजशास्त्रीय अर्थ याचा जणू घनिष्ठ संबंध आहे, कारण बोनस हा फक्त आर्थिक लाभ नाही, तर श्रम मूल्यांचा, भागीदारीचा आणि सामाजिक प्रतिष्ठेचा प्रतिक आहे.समाजशास्त्रात सामाजिक संस्थांमधील आर्थिक संस्थेचा अभ्यास करताना असे लक्षात येते की उत्पादन, वितरण व विनिमय यांच्या माध्यमातून सामाजिक संबंध स्थिर होतात किंवा बदलतात. एमिल दुर्खीम यांच्या मते, आर्थिक संस्था ह्या सामाजिक तथ्य आहेत, ज्याचा परिणाम सामाजिक जीवनावर होतो. याच धाटणीवर तात्विक दृष्ट्या पाहता, बोनस हे केवळ मेहनतीचा मोबदला नसून कामगार-मालक संबंध व सामाजिक समतेचा एक चक्रव्यूह आहे.

कार्ल मार्क्स यांच्या श्रममूल्य सिद्धांताप्रमाणे उत्पादनात श्रमिकाचा सहभाग हे मूळ आहे; पण जर त्यांना योग्य वाटा मिळाले नाही, तर आर्थिक विषमता समाजशास्त्रीयदृष्ट्या वर्गसंघर्ष तयार करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे दृश्य भारताच्या संदर्भात ओळखले व बोनसच्या माध्यमातून कामगारांना न्याय मिळावा हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार चळवळीची दिशादर्शक भूमिका घेतली. १९३६ मध्ये त्यांनी खपवशशिपवशपीं/डरलेींी/झरीींू स्थापन केली, ज्यात त्यांनी मजुर वर्गाचे सामाजिक व आर्थिक हितकर्ते म्हणून भूमिका स्वीकारली. या पक्षाच्या घोषणापत्रात त्यांनी बोनस, पेन्शन व निवृत्ती लाभ यांचा समावेश केला होता. त्यांनी संयुक्त विद्रोहाच्या मार्गाने आर्थिक व सामाजिक न्यायासाठी कामगार संघटनांची गरज अधोरेखित केली. १९४२ ते १९४६ या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उपाधिनियुक्त कामगार मंत्री म्हणून 'इंट्रीम व्हायसरॉय' सल्लागार मंडळात काम करत होते. या काळात त्यांनी कामाचे तास कमी करणे, सुट्या देणे, कामगारांसाठी विमा व सामाजिक सुरक्षा यांसारख्या नव्या कायद्यांची मांडणी केली.

बोनससंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धोरण हे सहभाग, वाटा आणि न्याय या तिन्ही घटकांवर उभे आहे. ते म्हणतात की उद्योगातील नफा हा केवळ भांडवलदाराचा नाही; तो मजुरांच्या श्रमाचा परिणाम आहे. श्रमिकाला योग्य बोनस मिळत असेल, तर तो व्यवसायाला व समाजाला समर्पित होतो आणि औद्योगिक शांतता व सामाजिक समानता वृद्धिंगत होतात. त्यामुळे बोनस हे एक सामाजिक नियंत्रणाचा आणि सामाजिक एकतेचा घटक बनते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळीच हे सांगितले की मजूर हे 'सामान्य वस्तू' नसून उत्पादन प्रक्रियेत मानवी घटक आहेत, आणि त्यांच्या कामाचं सामाजिक मूल्य आहे.

भारतीय संविधानाला कामगारांच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने पाहिल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या संरचनेमध्ये 'सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय' हे तत्त्व समाविष्ट केले. संविधानातील निर्देशात्मक तत्त्वाधिकार (ऊळीशलींळींश झीळपलळश्रिशी ेष डींरींश झेश्रळलू) अंतर्गत कलम ४३ मध्ये 'मानवी गरजेची जीवनशैली' व योग्य उत्पन्न यांशिवाय कामगारांसाठी योग्य वेतन व सुयोग्य जीवनमान देण्याची राज्याची जबाबदारी सांगितली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बोनसविषयक विचार या तत्त्वाशी सुसंगत आहेत कारण ते म्हणतात की कामगाराला फक्त रोजगार मिळावा एवढे पुरेसे नाही, तर त्यांना त्या रोजगारातून योग्य वाटा मिळावा, ज्यातून त्यांचा सामाजिक दर्जा उंचावला जावा.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, बोनस हे वितरक न्याय (वळीीळलींीींळींश क्षीींळलश) आणि आर्थिक समता (शलेपोळल ळपींशसीरींळेप) या संकल्पनांचा प्रत्यक्ष आधार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय सामाजिक रचनेतील जातीवाद आणि वर्गवाद यांना एकत्र पाहिले आणि सांगितले की आर्थिक विषमता ही सामाजिक विषमतेची मूळ आहे. त्या दृष्टिने बोनसची संकल्पना श्रमिकांना उत्पादन प्रक्रियेत 'भागीदार' म्हणून स्वीकारण्याचा एक मार्ग आहे. भागीदारीमुळे सामाजिक प्रतिष्ठा वाढते आणि उत्पादन संबंधांमधील विसंगती कमी होते. आजच्या जागतिकीकरण व आधुनिकीकरणाच्या काळात जेव्हा कामगार हक्कांवर प्रश्न निर्माण होत आहेत, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बोनसविचार अधिकच समर्पक ठरतो. उद्योगसम्बंधी कायदे आणि कामगार कल्याणाच्या मोहिमांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याचा आधार दिला; त्यांनी कामगारांच्या संघटनांना मान्यता दिली, कामाच्या वेळा मर्यादित केल्या, कामगार विमा व कल्याण यांच्या सूत्रावर काम केले.

बोनस किंवा उत्पादनातील नफ्याचा कामगारांसाठी योग्य वाटा हा त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्शनाचा अविभाज्य भाग होता.

आजही जेव्हा बोनस कायदा किंवा कामगार हक्क चर्चा मध्ये येतात, तेव्हा त्यांच्या विचारांची अनिवार्य आठवण येते. अशी आर्थिक सामाजिक समता कार्यान्वित झाल्यास औद्योगिक समाजात सामाजिक एकात्मता व स्थैर्य वाढतात हे समाजशास्त्रज्ञांनीही मानले आहे. त्याअर्थाने, 'उद्योगशासन' व 'उत्पादन संबंध' या घटकांमध्ये कामगारांचा सहभाग जितका जास्त असेल, तितकी सामाजिक समानता वाढेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बोनसदृष्टिकोनात हे स्पष्ट दिसते. त्याचबरोबर, कामगारांना श्रममूल्याची योग्य किंमत न मिळाल्यास त्यांच्या जीवनरक्षक गरजा पूर्ण होत नसतील तर त्यामुळे सामाजिक न्यायाचा पाया हलू शकतो.

समाधानकारक ध्येय हे केवळ बोनस देऊन पूर्ण होत नाही; त्याचबरोबर कामगारांचे स्थायी कल्याण, सुरक्षीत कामाची अट, आरोग्यसुविधा, निवृत्ती वेतन योजना आणि सामाजिक सहभाग या सर्व बाबी जोडणे गरजेच्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की कामगारांनी केवळ वेतन व बोनसपुरते स्वतःची मागणी मर्यादित ठेवू नये; त्यांना आर्थिक व राजकीय निर्णयप्रक्रियेत भाग घेण्याचीही गरज आहे. समाजात 'सामाजिक एकात्मताही' महत्वाची आहे. दुर्खीम यांच्या मते, सेंद्रिय एकात्मता म्हणजे आधुनिक औद्योगिक समाजात विविध घटकांमधील संबंधाचा आधार आहे. या दृष्टीने बोनससारख्या यंत्रणांनी कामगार व मालक यांच्या संबंधात एक प्रकारचा गुंतवणूक भागीदारत्व निर्माण केले जाते, ज्यामुळे परस्पर अवलंबित्व व सहयोग वाढतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामगारहितधर्मातून हे प्रत्यक्ष दिसते. त्याचबरोबर, त्यांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन असा होता की विकासाचा लाभ सर्वांना पोहोचला पाहिजे, मात्र ते लाभ भांडवलदार किंवा काही उद्योगगटांना घेऊ न देता त्यात कामगारांचा योग्य वाटा सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

म्हणूनच आपण आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बोनस : सामाजिक न्यायाचा आर्थिक पाया हे विषय घेताना, बघतो की बोनस ही संकल्पना आजही फक्त उद्योगातील आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित नाही, तर ती सामाजिक बदल, श्रमिक सन्मान व मानवी प्रतिष्ठेची विषयवस्तू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे विचार श्रमिकांना आर्थिक सक्रिय भागीदार बनवणे, उत्पादन प्रक्रियेत त्यांना स्थान देणे आणि समाजातील विषमता दूर करणे या ध्येयाने मांडले. भारतीय समाजात सामाजिक न्यायाचे व आर्थिक समतेचे स्वप्न आजही त्यांच्या या विचारांच्या बळावर पुढे चालू आहे.

या लेखातून असे स्पष्ट होते की कामगारांना बोनस मिळणे हे फक्त आर्थिक प्रोत्साहन नसून समाजशास्त्रीय संकल्पना आहे, ज्यामध्ये श्रमस्वीकृती, सामाजिक कदर, आर्थिक समता आणि औद्योगिक शांतता यांचा संगम आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या तत्त्वाचा अभ्यास करून त्याची व्यावहारिक रूपरेषा आखली. आजच्या बदलत्या काळात, जिथे कामगारांच्या हक्कांविषयी प्रश्न निर्माण होत आहेत, त्यांच्या या विचारांचे पुनरावलोकन अधिकच आवश्यक ठरले आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
**आत्ताच एक्सप्रेस**
छत्रपती संभाजीनगर
गुरुवार २३ ऑक्टोबर २०२५


# 'दिवाळी सण मोठा. नाही आनंदाला तोटा

सर्वात मोठा सण
म्हणून धूमधडाक्यात
करतो साजरा प्रत्येकजण

हा सण संपूर्ण भारतामध्ये सर्वत्र साजरा केला जातो. हजारो वर्षापासून हा सण साजरा करण्याची पद्धत रूढ आहे. या सणानिमित्त संपूर्ण देशभर सार्वजनिक सुट्टी असते. पावसाळा नुकताच संपलेला असतो. खरीप हंगाम संपलेला असतो. नुकतेच पीक आलेले असते. शेतकऱ्याचे घर याच काळात धनधान्याने समृद्ध झालेले असते. तरीही अनेक नैसर्गिक व इतरही अनेक समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागतेच. ही गोष्ट निराळी परंतु त्यातल्या त्यात हा काळ शेतकऱ्याच्या भरभराटीचा काळ असतो. म्हणून 'कृषीउत्सव' स्वरूपात हा सण साजरा करण्याची पद्धत आहे. श्रावण महिन्यापासून सुरु झालेली सणांची मालिका दिवाळीला फार मोठ्या प्रमाणात बहरते. अश्विन वद्य द्वादशी पासून ते कार्तिक शुद्ध द्वितीया पर्यंत हा 'दीपोत्सव' सुरू राहतो.

अशाप्रकारे साधारणत: सहा-सात दिवस हा सण अत्यंत आनंदात, उत्साहात व जल्लोषात प्रत्येक घराघरात, गावागावात, शहराशहरात, राज्या-राज्यात, संपूर्ण देशात याच्याही पुढे जाऊन आज संपूर्ण जगात साजरा होत आहे. या दीपावली सणाची व्याप्ती बघून हा सण जागतिक सण झालेला आहे. या सणाच्या संदर्भात अनेक अध्यात्मिक, पौराणिक कथा सांगितल्या जातात. फार मोठे महत्त्व या सणाचे आहे. दिवाळी हा खऱ्या अर्थाने 'कृषीउत्सव' आहे.

दिवाळी या सणाची सुरुवात शेतकऱ्याला शेत पिकवण्यासाठी मोलाची मदत करणाऱ्या बैलाचे व त्याला जन्म देणाऱ्या गाईचे ऋण व्यक्त करण्याच्या दिवसापासून म्हणजे गोवत्स द्वादशी या दिवसापासून होते. रमा एकादशी नंतर येणाऱ्या अश्विन वद्य द्वादशीला गोवत्स द्वादशी, वसुबारस आणि गुरुद्वादशी असे म्हणतात. या दिवशी सवत्स धेनूची विधिवत पूजा करण्याची प्रथा आहे. हिंदू धर्मात गाईला अत्यंत पवित्र मानले आहे. गायीमध्ये ३३ कोटी देवांचा वास आहे असे समजल्या जाते. अशा पवित्र गोमातेची कृतज्ञ अंत:करणाने तिच्या वासरासह, पाडसासह विधीवत पूजा करून तिला नैवेद्य दिला जातो. श्रद्धेने तिचे दर्शन घेतले जाते.

यानंतर आश्विन वद्य त्रयोदशीला 'धनत्रयोदशी' साजरी केली जाते. यालाच 'धनतेरस' असेही म्हणतात. धनत्रयोदशीच्या दिवशी धनधान्याची, धनसंपत्तीची पूजा केली जाते. सर्वत्र दिव्यांचा झगमगाट केला जातो. धनत्रयोदशी ची एक अध्यात्मिक कथा आहे या कथेनुसार या दिवशी अपमृत्यु, अकाली मृत्यू टाळण्यासाठी मृत्यू देवता यमाला दीपदान केले जाते. यमदीपदान करून प्रत्येकजण उदंड आयुष्याची प्रार्थना मृत्यू देवता यमाकडे करतात. याच दिवशी समुद्रमंथनातून आरोग्य देवता श्री धन्वंतरी अमृतकुंभ घेऊन प्रगटले होते. त्यामुळे धनत्रयोदशीच्या दिवशी 'धन्वंतरी जयंती' सुद्धा साजरी केली जाते. यानिमित्ताने सर्व डॉक्टर, वैद्य, आरोग्य क्षेत्रात काम करणारे सर्व कर्मचारी 'धन्वंतरी जयंती' साजरी करतात. श्री धन्वंतरी देवतेची पूजा आराधना करतात. श्री 'धन्वंतरी जयंती' औचित्य साधून संपूर्ण देशभरात डॉक्टर, नर्स, आरोग्य कर्मचारी, सर्व प्रकारची औषधे यांचा आदर-सन्मान केला जातो. आयुर्वेदिक शास्त्रांमध्ये श्री धन्वंतरी देवतेला प्रचंड महत्त्व आहे. दिवसेंदिवस आयुर्वेदाचे महत्त्व संपूर्ण जगाला ज्ञात होत आहे. म्हणूनच संपूर्ण जगात श्री 'धन्वंतरी जयंती' व 'आयुर्वेद दिन' धनत्रयोदशीच्या दिवशी साजरा करण्यात येत आहे. अशाप्रकारे धनत्रयोदशी चे महत्व अनन्यसाधारण आहे.

यानंतर आश्विन वद्य चतुर्दशीला 'नरकचतुर्दशी' म्हणजे दिवाळीचे पहिले पाणी साजरे केले जाते. या मुहूर्तावर अत्यंत अन्यायी असणाऱ्या नरकासुराचा वध भागवान श्रीकृष्णाने केला. व त्याच्या बंदिवासात असणाऱ्या सोळा सहस्त्र महिलांना मुक्त केले. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी प्रभू श्रीकृष्णाने या सोळा सहस्त्र महिलांशी विवाह केला. अशी आख्यायिका सांगितल्या जाते. नरक चतुर्दशीला अभ्यंगस्नानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून सुगंधी उटणे व तेल लावून अभ्यंगस्नान केले जाते. दिवाळी सणात प्रभू श्रीकृष्णाच्या शौर्याचे प्रतिक म्हणून नरक चतुर्दशी हा सण साजरा केला जातो.

अश्विन अमावस्या म्हणजे लक्ष्मीपूजन. या दिवशी स्थिर मुहूर्तावर श्री लक्ष्मी देवतेची पूजा आराधना केली जाते. घरामध्ये सुख, शांती, समृद्धी व आर्थिक भरभराट राहावी यासाठी श्री लक्ष्मी देवतेची उपासना केली जाते. श्रीसुक्ता चे पठण करण्यात येते. यथोचित व षोडशोपचार श्री लक्ष्मीदेवीची पूजाविधी घराघरात होतो. व्यापारी मंडळी यादिवशी आपल्या दुकानात विधिवत श्री लक्ष्मी देवीची पूजा उपासना करतात. वही पूजन केले जाते. याच लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर घराघरात लक्ष्मी रूपात वावरणाऱ्या लेकी-सुना, माता-भगिनी, यांचा सुद्धा यथोचित सन्मान केला जातो. त्यांचा आदर सत्कार करण्यात येतो.

कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजेच 'बलिप्रतिपदा' यालाच 'दिवाळी पाडवा' असेही म्हणतात. साडेतीन मुहूर्तापैकी एक असणारा हा मुहूर्त आहे. या दिवशी बळीराजाची पूजा केली जाते. बळी हा शेतकऱ्यांचा राजा आहे. म्हणून आजचा शेतकरी हाच खऱ्या अर्थाने बळीराजाचे प्रतिनिधित्व करतो. बळीराजा खूप दानशूर असतो. त्याच्याकडे आलेल्या कुणालाही दान देऊन तृप्त केल्याशिवाय तो परत पाठवत नाही. त्याचप्रमाणे आजचा शेतकरी सुद्धा संपूर्ण जगाला, विश्वाला भरभरून देत आहे. शेतकरी हा संपूर्ण जगाचा, विश्वाचा पोशिंदा आहे. तरीसुद्धा अनेक अस्मानी-सुलतानी संकटाला आजही शेतकऱ्याला सामना करावा लागत आहे. आजही शेतकऱ्यावर एकामागून एक अशी अनेक संकटे येत आहेत. हा आजचा बळीराजा संकटाशी सामना करता करता हतबल होत आहे. या शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःख नाहीसे व्हावे व त्याच्या जीवनातही सुखाचे दिवस यावेत यासाठीच 'बलिप्रतिपदा' म्हणजे 'दिवाळी पाडवा' साजरा केला जातो. म्हणून या दिवशी म्हणतात..

इडा पिडा टळू दे
बळी राज्य येऊ दे...
माझ्या शेतकऱ्यावरची संकटे
देवा आता तरी संपू दे....
त्याच्याही जीवनात सुखाचे
चार दिवस येऊ दे....

याच दिवशी संपूर्ण गोकुळ वासियांचे इंद्र प्रकोपाने होणाऱ्या अतिवृष्टी पासून संरक्षण करण्यासाठी भगवान जगद्गुरु श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलण्याची अख्यायिका सांगितली जाते. त्यामुळे बलिप्रतिपदेच्या दिवशी भक्तीभावाने गोवर्धन पर्वत उचलून सर्वसामान्याचे रक्षण करणाऱ्या प्रभू श्रीकृष्णांची पूजा केली जाते. व्यापारी मंडळी या दिवसापासून नवीन वर्षाला सुरुवात झाली असे म्हणतात. पाडव्याच्या मुहूर्तावर सोने-चांदी, दाग-दागिने, वाहने, व नवनवीन मौल्यवान वस्तूंची खरेदी केली जाते. कोणत्याही कामाची सुरुवात करण्यासाठी सुद्धा हा मुहूर्त अत्यंत शुभ मानला जातो. म्हणून पाडव्याच्या मुहूर्तावर अनेक दुकाने, अनेक कारखाने, अनेक नवीन प्रकल्प सुरु होतात.अशाप्रकारे बलिप्रतिपदेला अत्यंत महत्त्व आहे.

कार्तिक शुद्ध द्वितीया या दिवशी दिवाळी सणाचा शेवटचा दिवस 'भाऊबीज' म्हणून साजरा केला जातो. यालाच यमद्वितीया असेसुद्धा म्हणतात. या बाबतही एक अख्यायिका सांगितली जाते. याच दिवशी यम आपल्या बहिणीला म्हणजे यमुना अर्थात यमीला तिच्या आग्रहास्तव भेटायला जातो. यमुना यमाचे खूप आदरातिथ्य करते. त्याच्यासाठी घर सजवते. रांगोळ्या काढते. घरामध्ये दिव्यांची आरास करते. सगळीकडे झगमगाट करते. यमासाठी गोडाधोडाचे पंचपक्वान्न करते. या आदरातिथ्याने यम यमुनेवर प्रसन्न होतो. तिला काय पाहिजे...? ते मागायला सांगतो अर्थात वर देतो. त्यावेळी त्याची बहीण त्या मृत्यूदेव यमाकडे मागणी करते..... या दिवशी जी बहीण आपल्या भावाला प्रेमाने ओवाळेल..... त्याचे औक्षण करेल.... त्याच्यासाठी दीर्घायुष्याची प्रार्थना करेल.... अशा प्रत्येक भावाला अपमृत्यू आणि अकाली मृत्यू येऊ देऊ नको.... त्याला दीर्घायुष्य मिळू दे.... हा वर मागते आणि यम प्रसन्नतेने हे वरदान यमुनेला देतो तेव्हापासून कार्तिक शुद्ध द्वितीयेला 'यमद्वितीया' म्हणजे 'भाऊबीज' साजरी करण्याची प्रथा सुरू झाली. बहिण भावाच्या प्रेमळ नात्याचे, मांगल्याचे आणि एकमेकांच्या पवित्र प्रेमाचे प्रतीक म्हणून हा सण साजरा केला जात आहे.

अशाप्रकारे अश्विन वद्य द्वादशी म्हणजे 'गोवत्स द्वादशी' पासून सुरु होणारा दिवाळी हा सण कार्तिक शुद्ध द्वितीया म्हणजे 'यमद्वितीये' पर्यंत चालतो. दिवाळी सणानिमित्त घरे सजवली जातात. घराची रंगरंगोटी सुशोभिकरण केले जाते. स्वच्छता साफसफाई केली जाते. घराला झेंडूच्या फुलाचे तोरण बांधले जाते. घरासमोर सुंदर रांगोळी काढली जाते.

वेगवेगळ्या पदार्थांचा फराळ केला जातो. घरावर आकाश कंदील लावला जातो. दीपावली सणांमध्ये दिव्यांना फार महत्त्वाचे स्थान आहे. या संपूर्ण सणात दिव्यांची आरास केली जाते. म्हणूनच खऱ्या अर्थाने दिवाळी हा 'दीपोत्सव' आहे. प्रत्येकाच्या जीवनातील अज्ञानाचा अंधकार ज्ञानाच्या दिव्याने नष्ट व्हावा.... हीच प्रार्थना दिवाळीनिमित्त केली जाते. दिवा हे ज्ञानाचे, प्रकाशाचे, तेजाचे, भक्तीचे, शक्तीचे आणि मांगल्याचे प्रतीक आहे.

दिवाळी हा सण आता फक्त भारतापुरता मर्यादित राहिलेला नाही. तर दीपावली हा सण आज संपूर्ण जगामध्ये उत्साहात, आनंदात आणि जल्लोषात साजरा होत आहे. दिवाळी या सणाला जागतिक स्वरूप येत आहे. जगभरातील भारतीय आपापल्या शहरात दिवाळी साजरी करतात.

अमेरिका येथील न्यू जर्सी या भागात भारतासारखी दुकाने सजवलेली आढळतात. लंडन शहरात ही दिवाळी साजरी केली जाते. दिवाळी हा प्रामुख्याने हिंदू तसेच दक्षिण आशिया व आग्नेय आशियातील अन्य धर्मीय समाजांत काही प्रमाणात साजरा केला जातो. भारत, गयाना, त्रिनदा, टोबॅगो, बीजिंग, मलेशिया, म्यानमार, न्यूयार्क, मॉरिशियस, सिंगापूर, श्रीलंका या देशांमध्ये दिवाळीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असते. या सर्व देशात अत्यंत आनंदात, उत्साहात आणि जल्लोषात दिवाळी सण साजरा केला जातो. अशा या जागतिक 'दीपोत्सवाच्या' 'प्रकाशोत्सावाच्या' आपणा सर्वांना खूप खूप तेजोमय शुभेच्छा...

सण दिवाळी सुखाचा....
दिवा पणतीची ज्योत
लख्ख पेटली अंगणी
नष्ट अज्ञान, अंधार
तेजाळली अंतर्मनी....

उंच आकाश कंदील
रुबाबाने झळकतो
यश, कीर्ती समाधान
सारे घरास मागतो....

सुगंधित उटण्याने
जसा देह गंधाळतो
मानवता दातृत्वाने
गंध कार्याला लाभतो....

चवदार फराळाची
गोडी शब्दांना लागू दे
दुरावल्या माणसांना
पुन्हा प्रेमाने भेटू दे....

उजळले आसमंत
दीपोत्सव प्रकाशाचा
घरा-घरात होऊ दे
सण दिवाळी सुखाचा....

दिवाळी प्रकाशोत्सवाच्या
आपणास मन:पुर्वक शुभेच्छा...!

**- मयूर मधुकरराव जोशी**
**लेखक, कवी, कथाकार, गझलकार, समीक्षक, सुत्रसंचालक, व्याख्याता, समुपदेशक विठ्ठल-रुक्मिणी नगर , जिंतूर. जि. परभणी.**

# देगलूर नगराध्यक्ष पदासाठी टेकाळे परिवाराचं नाव आघाडीवर

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/प्रतिनिधी**/देगलूर नगराध्यक्ष पदाचे आरक्षण ओबीसी महिलांसाठी जाहीर झाल्यामुळे शहराच्या राजकारणाला निर्णायक वळण मिळाले आहे. या आरक्षणामुळे अनेक जुनी समीकरणे बदलली असली तरी, जनतेमध्ये आणि राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा टेकाळे परिवाराचे नाव चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये सध्या सर्वाधिक प्रभावी आणि लोकप्रिय असलेले व्यक्तिमत्व म्हणजे समाजसेवक व दानशूर म्हणून ओळखले जाणारे बबलू टेकाळे.गेल्या काही वर्षांपासून त्यांनी समाजकारणाच्या माध्यमातून देगलूर शहरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांची सामाजिक बांधिलकी, सामान्य नागरिकांशी असलेला थेट संपर्क आणि कोणत्याही कामाप्रती असलेली त्यांची निष्ठा यामुळे त्यांनी नागरिकांचा प्रचंड विश्वास संपादन केला आहे. शहरात सामाजिक, शैक्षणिक किंवा धार्मिक-सांस्कृतिक अशा कोणत्याही उपक्रमात बबलू टेकाळे यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांचा साधेपणा, सहज वागणूक आणि मदतीसाठीची तत्परता या गुणांमुळे ते अल्पावधीतच सर्वांच्या मनात घर करून बसले आहेत.

**नागरिकांच्या मते बबलू टेकाळे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता..!**

नगराध्यक्ष पदाचे आरक्षण ओबीसी महिलांसाठी निश्चित झाल्यानंतर पक्षांतर्गत हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये टेकाळे परिवारातील महिला उमेदवाराला संधी मिळण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. बबलू टेकाळे यांचा संघटनात्मक प्रभाव आणि मजबूत नेतृत्वगुण या निर्णयामागे मुख्य कारणे मानली जात आहेत. कार्यकर्त्यांपासून सर्वसामान्य मतदारांपर्यंत एकच चर्चा आहे की, बबलू टेकाळे यांच्या नेतृत्वाखालीच देगलूर नगरपरिषदेचे नवे पर्व सुरू होऊ शकते.



टेकाळे परिवारातील कोणतीही महिला उमेदवार रिंगणात उतरल्यास, बबलू टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उभे राहणारे मजबूत संघटन ही निवडणूक निर्णायक बनवण्यासाठी सज्ज आहे. त्यांची लोकप्रियता आणि दानशूर वृत्ती यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. टेकाळे परिवाराचे नेतृत्व म्हणजे विकास, पारदर्शकता आणि सामान्य माणसाचा आवाज अशी भावना अनेक नागरिकांनी सामाजिक माध्यमांवर व्यक्त केली आहे.

सध्याच्या बदललेल्या राजकीय परिस्थितीत, देगलूरचे राजकारण एका निर्णायक वळणावर उभे आहे. आरक्षणामुळे नवा उमेदवार रिंगणात येणार असला तरी, शहराच्या जनतेच्या मनात आजही बबलू टेकाळे यांचे नाव ठसलेले आहे. टेकाळे परिवारातून उभा राहणारा उमेदवार जनतेच्या हितासाठी काम करणारा आणि सर्वांना न्याय देणारा असेल, असा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. त्यामुळे या निवडणुकीत टेकाळे परिवार आणि विशेषतः बबलू टेकाळे यांच्या नेतृत्वाभोवतीच सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. नगराध्यक्षपदाचे आरक्षण महिलांसाठी असले तरी देगलूरचे खरे नेतृत्व बबलू टेकाळे यांच्या हातात आहे, अशी चर्चा गल्लीबोळात आणि राजकीय वर्तुळात सध्या रंगत आहे.

# विधीज्ञ कृष्णा पाटील जाधवांच्या मध्यस्तीस यश,तहसीलदार कडवकरांनी केला सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/उदय कुलकर्णी**/तालुक्यातील करंजखेडा गावातील शेतजमिनीचा गेल्या ७० वर्षांपासून प्रवलंबीत असलेला वाद कन्नडचे नामांकित विधीज्ञ कृष्णा पाटील जाधव यांचे माध्यस्थीने व तहसीलदार विद्याचरण कडवकर यांचे सहकार्याने अखेर कायमचा संपुष्टात आला आहे.अधिकची माहीती अशी की,करंजखेडा गावातील गट.क्र.३७व गट क्र.६५ मधील एकूण क्षेत्र १६ एकर १८ गुंठे असे असुन या जमिनीचे मुळ मालक स्वातंत्र सैनिक कै.क्रांतिसिंह उर्फ तेजपाल देशमुख हे होते.पण सदर जमिन मिळकतीवर कुळ म्हणून किसन तुपे यांचे नावाची नोंद होती.त्यांना हैद्राबाद कुळ शेती कायदा १९५० चे कलम ३५ व ३७अन्वेय संरक्षित कुळाचे प्रमाणपत्र मिळालेले होते.तरीही त्यांनी दि.१५ जुन १९५२ रोजी तत्कालीन तहसीलदार यांचे समक्ष व साक्षीदारांसमोर हक्क घेण्यास नकार देऊन हक्क सोडला होता.इतके होऊनही राजस्व कागदोपत्री कुळचा उल्लेख कायमच राहिल्याने सदर वाद पुढे गेल्या ७० वर्षांपासून तसाच चालूच राहिला.व त्यामुळे किसन तुपे यांनी तहसील कार्यालयात कागदपत्रे दाखल करून पुन्हा जमिनीवर ताबा मिळण्याचा हक्क मंजूर करून घेतला.परंतु प्रत्यक्षात ताबा मात्र त्यांना मिळवता आला नाही.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे मुलाने काशिनाथ तुपेने ताबा मिळवणेसाठी संघर्ष चालू ठेऊन तहसील,उपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी व पुनःच तहसील असे हे



प्रकरण चालूच राहिल्याने शेवटी हे प्रकरण आत्ताचे तहसीलदार विद्याचरण कडवकर यांचे कडे सुनावणीसाठी आले. त्यात विधीज्ञ कृष्णा पाटील जाधव यांनी दोन्ही बाजूच्या पक्षकारांना व विधीज्ञाना एकत्रित बसून फायदा - तोट्याचे गणित समजावून सांगितले व सदर वाद सर्व संमतीने मिटविण्यात यश मिळविले.त्यांनी केलेल्या या मध्यस्थीने व जुनावाद कायमचा मिटल्याने तहसीलदार विद्याचरण कडवकरांनी विधीज्ञ कृष्णा पा.जाधव यांचे आभार मानून सत्कार केला.या वेळी नायब तहसीलदार दिलीप सोनावणे,प्रशांत काळे, विधीज्ञ.बि.डी. थोरात,भगवान चव्हाण,विजय चव्हाण,शिंदे,यांचे सह इतर विधीज्ञ, महसूल कर्मचारी दोन्ही बाजूचे पक्षकार व तहसील कार्यालयातील कर्मचारी वर्ग उपस्थीत होते.

# मतचोरी आणि सत्ताधिकाऱ्यांची शिरजोरी : लोकशाहीच्या पाया खाली घडणारी

देशाच्या लोकशाही व्यवस्थेवर आज गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. निवडणुकीच्या काळात वारंवार समोर येणाऱ्या मतचोरीच्या आरोपांनी आणि सत्ताधाऱ्यांच्या शिरजोरीच्या घटनांनी जनतेच्या विश्वासाचा पाया हादरवला आहे. लोकशाहीचा आत्मा असलेले मतदान आता अनेक ठिकाणी केवळ औपचारिकता ठरत चालले आहे, ही चिंतेची बाब आहे.

लोकशाही म्हणजे जनतेचा, जनतेसाठी आणि जनतेद्वारे चालणारा शासनप्रकार. परंतु आजच्या काळात हाच लोकशाहीचा पाया हलू लागला आहे. कारण वाढत चाललेली मतचोरी, सत्तेची लालसा आणि सत्ताधिकाऱ्यांची शिरजोरी.

निवडणूक हा लोकशाहीचा सण असावा, पण तो आता पैशांचा, सत्तेचा आणि प्रभावाचा खेळ बनत चालला आहे. आज बहुसंख्य राजकीय नेत्यांना सत्ता म्हणजे सेवा नव्हे, तर संपत्ती आणि स्वतःच्या अहंकाराची पूर्तता वाटू लागली आहे. त्यासाठी ते काहीही करायला मागेपुढे पाहत नाहीत. मग ती मतदारांची फसवणूक असो, मतदान यंत्रे हाताळण्याचे आरोप असोत किंवा जनतेच्या नावावर राजकारण करून स्वतःचे पोट भरणे असो. जनतेचा मतदानाचा अधिकार हा सर्वात पवित्र आहे. पण जेव्हा मतचोरीच्या अफवा आणि पुरावे समोर येतात, तेव्हा लोकांचा विश्वास डळमळतो. त्या क्षणी लोकशाहीला जणू कुणीतरी छेद दिला आहे, असे वाटते.

सत्तेची खुर्ची राखण्यासाठी काही नेत्यांना आता कायद्याची आणि नैतिकतेची बंधने गौण वाटू लागली आहेत. मतदारांची मने जिंकण्याऐवजी ती विकत घेण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. सोशल मीडियापासून मतमोजणी यंत्रांपर्यंत सर्वत्र शंका निर्माण होत आहेत. लोकशाहीचा पाया असलेला जनतेचा विश्वासच जेव्हा डळमळतो, तेव्हा लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात येते. या परिस्थितीत माध्यमांनी लोकशाहीचा प्रहरी म्हणून भूमिका पार पाडणे अत्यंत गरजेचे आहे. मतचोरीच्या प्रकरणांवर सत्य उघड करणारे निर्भय पत्रकार आणि सजग नागरिकच या काळाचा खरा आधार आहेत. समाजानेही भीती बाजूला ठेवून सत्याचा आवाज बुलंद करायला हवा.मतदानाचा हक्क हा प्रत्येक नागरिकाला दिलेला पवित्र अधिकार आहे. पण जेव्हा त्या मताची चोरी होते, तेव्हा ती केवळ राजकीय फसवणूक नसते तर ती जनतेच्या आशेचा आणि विश्वासाचा अपमान असतो. जनतेच्या स्वप्नांवर गदा आणणारी ही प्रवृत्ती थांबवणे हे प्रत्येक सजग नागरिकाचे कर्तव्य आहे. मतांची चोरी म्हणजे जनतेच्या स्वप्नांची चोरी. एका मतदाराने मतदान करताना देशाबद्दल, भविष्याबद्दल आणि आपल्या मुलांबद्दल स्वप्न पाहिलेली असतात. पण जेव्हा ती मते विकली जातात, खोटी मोजली जातात किंवा लपवली जातात. तेव्हा ती केवळ मतांची नव्हे, तर जनतेच्या आशेची चोरी असते. हीच ती वेळ असते जेव्हा लोकशाही मृत्यूशय्येवर जाते आणि शासन एकाधिकारशाहीत रूपांतरित होते. सत्ताधिकाऱ्यांची शिरजोरी आम्हीच कायदा असा अहंकार.

सत्ता टिकवण्यासाठी आज अनेक जण कायद्यापेक्षा वर असल्याचा आविर्भाव करतात. प्रशासन, यंत्रणा, न्यायव्यवस्था सर्व काही आपल्या मुठीत असल्याचा भ्रम निर्माण होतो. सर्व काही आपल्या ताब्यात असल्याचा अहंकार त्यांच्या वर्तनातून झळकतो. पण विसरतात ते एकच सत्य की, जनतेच्या श्वासावर कोणाचंही नियंत्रण नाही. इतिहास साक्षी आहे, जिथे सत्ताधारी अहंकाराने माणुसकी विसरतात, तिथे क्रांती जन्म घेते आणि ती क्रांती बंदुकीची नसते. ती असते जनतेच्या मनातील जागृतीची क्रांती. अहंकाराचे साम्राज्य नेहमी तात्पुरतेच ठरते.

आज माध्यमांनीही लोकशाहीचे आरसे राहणे आवश्यक आहे. पण काही माध्यमे सत्तेच्या जाहिरातीचे पोस्टर बनली आहेत. सत्य बोलणाऱ्यांना आवाज द्या, आणि मतचोरीचा पर्दाफाश करा, ही समाजाची आणि पत्रकारितेची जबाबदारी आहे. लोकशाही फक्त मतदानाच्या दिवशी जिवंत नसते, ती दररोज जागी ठेवावी लागते. मतचोरी आणि सत्तेचा दुरुपयोग थांबवायचा असेल, तर प्रत्येक नागरिकाने आपल्या मताचा सन्मान करावा, विक्रीला नकार द्यावा आणि सत्तेच्या अन्यायाविरुद्ध ठाम उभे राहावे. आज गरज आहे धैर्याची, जागृतीची आणि प्रामाणिकपणाची. कारण जोपर्यंत जनतेचे मत विकत घेतले जाते, तोपर्यंत खरी लोकशाही उभी राहू शकत नाही आणि जोपर्यंत सत्ताधाऱ्यांचा अहंकार मोडला जात नाही, तोपर्यंत न्यायाचा सूर्य उगवणार नाही. कारण, मत विकले की भविष्य हरते आणि आवाज उठवला की लोकशाही जिंकते.

**-प्रवीण बागडे**
**नागपूर**






















हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813